# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१.

दूरध्वनी : २२०२६२४९, २२८३५२४७, २२०२५३५४.(थेट)

फॅक्स : २२८२१२६९.

ई-मेल पत्ता : headquarters@mjp.gov.in

वेब पत्ता : mahamjp.com


## // परिपत्रक क्रमांक १५८ //

विषय :मंत्रालय स्तरावर आयोजित बैठकीसाठी टिप्पणी सादर करताना, घ्यावयाची खबरदारी.

मा.मंत्री महोदय, मा.प्रधान सचिव यांच्याकडील बैठकींसाठी उपस्थित राहण्याविषयी तसेच बैठकीसाठी सविस्तर तयारी करुन येण्याविषयी या कार्यालयाचे परिपत्रक क्र.१०२ व १२० अन्वये सर्व मंडळ व विभागीय कार्यालयांना सविस्तर सूचना देण्यात आलेल्या आहेत.

वरील बैठकींसाठी क्षेत्रिय कार्यालयांकडून प्राप्त होणाऱ्या टिप्पणीत संबंधीत योजनेविषयीची सर्व माहितींचा समावेश असतो. मात्र, बैठक ज्या कारणासाठी बोलाविण्यात आलेली आहे, त्या संबंधीची कारणे, अडचणी, उपाययोजना इत्यादींविषयीचाही उहापोह टिप्पणीत नमुद करणे आवश्यक आहे.

यापुढे विषयांकित बैठकींसाठी टिप्पणी सादर करताना संबंधीत योजनांच्या सर्व माहितीचा समावेश असलेली सविस्तर टिप्पणी सादर करताना, त्यासोबतच बैठकीत प्रस्तुत योजनेविषयी उपस्थित होणारे मुद्दे विचारात घेऊन, योजने संबंधीचा सारांश/ठळक तपशील, काही अडचणी असल्यास त्याबाबतचा थोडक्यात तपशील, तसेच अडचणींविषयीच्या उपाययोजना इत्यादींबाबत Bullet Points च्या उल्लेखासह, एक पानाची स्वतंत्र टिप्पणी सादर करावी.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
मुंबई-२१
रवाना
सही 28.3.15

(डॉ.हेमंत लांडगे)
सदस्य सचिव

जा.क्र.मजीप्रा/सस/तांशा-२/३५०/३११
दि. २६ मार्च, २०१५

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी :

- मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
- अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ (सर्व)